# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २०/०८/२०२४ (मंगळवार) सायंकाळ

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत मौजा रबडीवाला वाय पॉइंट मौदा येथे दिनांक १९/०८/२०२४ चे ०७.२८ वा. ते ०८.१५ वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, भंडारा कडुन नागपुरकडे काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने भंडारा ते नागपुर रोडवरील मौदा शिवारातील रबडीवाला फाटा येथे भंडारा ते नागपुर रोडवर नाकाबंदी केली असता भंडारा कडुन नागपुर कडे येणा—या पिकअप क्र. MH-40/BL-9841 क्रमांकाच्या वाहनास थांबवुन तपासले असता सदर वाहनात **आरोपी क्र. १) चालक नामे विजय सुकदास बोरकर वय २८ वर्ष २) वाहक नामे— मंगलेश राजेश मारबते वय २३ वर्ष दोन्ही रा. चंगेरा त. जि. गोंदिया** यांच्या ताब्यातुन बोलेरो पिकअप क्र. MH-40/BL-9841 किंमती ५,००,०००/—रू २) बोलेरो पिकअप मधील ०७ म्हशीचे पारडे प्रत्येकी किंमती २०,०००/—रू प्रमाणे एकुण १,४०,०००/—रू असा एकूण ६,४०,०००/—रू चा मुद्देमाल जनावरांना अवैद्यरित्या विनापरवाना कोंबुन, निर्देयतेने वागणुक देवून पाण्याची व चाऱ्याची सोय न करता वाहतुक करतांनी मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोअं. अतुल निंबार्ते पोस्टे मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11(1),11(1)(d), 11(1)(e), 11(1)(f) प्राण्यांना छळ प्रति. अधिनियम १९६० कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. दोन्ही आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि चौधरी हे करीत आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर